पाच चिमण्या

एक जपानी लोक कथा



रूपान्तरण: पैट्रिशिया मोंटगोमरी न्यूटन

मराठी: अश्विनी बर्वे

एक दयाळू जपानी वृद्धेने जखमी चिमण्यांना वाचवले. तिची काळजी घेत तिला बरं करतांना तिने आपल्या फायद्या तोट्याचा विचार केला नाही. चिमण्यावरचे तिचे प्रेम आणि स्नेह बघून तिचा परिवार आणि तिचे शेजारी तिची चेष्टा करत. पण ती त्याकडे लक्ष देत नाही. ती चिमण्याची बडदास्त ठेवत राहिली.

दुसऱ्यांना करुणा दाखवली तर त्याचे बक्षीस जरूर मिळते. चिमण्या पूर्णपणे बऱ्या होऊन आपल्या सोबत्याकडे परत जातात. पण त्या परत येऊन म्हातारीला तुंबीचे बी देते. बी काळजीपूर्वक पेरले जाते.त्यातून उगवलेल्या रोपाचा सांभाळ वृद्धा करते. त्यातून जादूच्या तुंबी निघतात. ज्यामुळे वृद्धेचे कुटुंब धनवान होते.

जे शेजारी तिची पहिले चेष्टा करत असत,आता ते तिच्यावर जळतात. कहाणी सांगते की बक्षीस आपल्या कर्मासाठी नाही तर त्यामागे असणाऱ्या विचारामुळे मिळते. प्रेमळ असणे हे दयाळू असण्याचे निशाण आहे, आणि लालच तर शेवटी लालच आहे. आणि त्या दोन्ही गोष्टीचे आपआपले बक्षीस असते.

पाच चिमण्या

एक जपानी लोककथा



रूपान्तरण: पैट्रिशिया मोंटगोमरी न्यूटन

भाषान्तर: पूर्वा याज्ञिक कुशवाहा



खूप काळा पूर्वी, सुदूर पूर्वेकडे वसलेल्या एका गावात एक वृद्धा आपल्या घराच्या बाहेर बसलेली होती, रात्रीच्या खाण्यासाठी तांदूळ पाखडत होती. वसंतातील खूप सुंदर सकाळ होती. आपले काम करत करत आजी आसपास खेळणाऱ्या मुलांचे बोलणे ऐकत होती.




अचानक एका चिमणीची वेदनादायक आवाज ऐकून वृद्धेची नजर वर गेली. तिने बघितले की काही मुले पसरलेले तांदळाच्या दाणे वेचणाऱ्या चिमण्यावर दगड फेकत आहेत.

एक दगड बरोबर निशाण्यावर लागला. तो एका चिमणीच्या पाठीवर बसला होता आणि चिमणी जखमी झाली होती. जखमी चिमणी जमिनीवर पडून लोळत होती. इतक्यात एक कावला आपली मोती चोच उघडत त्या बिचाऱ्या चिमणीला मारण्यास वेगाने येतांना तिने बघितले.



आजी घाबरून पळाली. टाळ्या वाजवल्या, जोरजोरात आवाज काढून तिने कावळ्याला हाकलले. मग अतिशय हळूवारपणे तिने जखमी चिमणीला उचलले. हळूहळू तिला गोंजारत तिला शांत केले.

आजीने एक छोटी टोपली शोधली. टोपलीत तिने कापडाचे तुकडे ठेवून तिचे मऊ घरटे तयार केले. चिमणीला त्या टोपलीत ठेवून ती झाकली आणि चिमणीला आराम करू दिला.

दुपारी आजीने टोपली घरात नेली. मग तिने तांब्याचे चूर्ण तयार करून त्याचे औषध बनवले. तिने मोठ्या प्रेमाने एका पातळ फांदीच्या मदतीने ते औषध तिने चिमणीच्या तोंडात घातले.

तिचे कुटुंब रात्रीच्या जेवणासाठी एकत्र आले. तिला जखमी चिमणीची बडदास्त ठेवतांना पाहून ते सगळे हसू लागले.

“आई, आपल्या काळानुसार करण्यासारखे चांगले असे काही तुझ्याकडे नाही का? तू तुझा वेळ या मूर्ख चिमणीवर का बरबाद करते आहेस? तिच्या सुनेने म्हटले. “चिमणी तर एवढी आजारी आहे की तिची तुम्ही एवढी काळजी करत आहात हे ही तिला कळत नसेल.”

आजीने आपल्या सुनेचे निर्लज्ज शब्द आणि परिवारातील लोकांनी केलेल्या चेष्टेला कानाआड केले. ती जीव ओतून चिमणीची काळजी घेत राहिली.

ती रोज तिला टिपण्यासाठी तांदळाचे दाणे आणि औषध देत असे. काही आठवड्यानंतर आजीने आपल्या कुटुंबाला सांगितले की त्यांनीही कधी त्या चिमणीला दाणापाणी द्यावे. पण त्यांनी तोंड फिरवून घेतले. “अग एवढी रडारड कशाला करते आहेस. शेवटी ती चिमणी आहे,” ते म्हणाले.

“तुम्हांला जे वाटेल तसा विचार करा, मला त्याची पर्वा नाही.” आजीने उत्तर दिले. “बिचारी, किती लाचार जीव आहे. “इकडे दिवसेंदिवस चिमणीची तब्येत सुधारत होती. काही महिन्यानंतर तिच्यात उडण्याची ताकद आली.



उन्हाळ्याच्या सुरवातीला एका उन्हाळी दिवशी आजीला वाटले की चिमण्यांना आता मुक्तपणे उडायला सोडायला हवे.

तिचे मन जड झाले होते. चिमणीच्या छोट्या डोक्यावर तिने शेवटचा हात फिरवला. तिने दरवाजा उघडला आणि हात मोकळा केला आणि चिमणीला सोडून दिले.

आजीच्या हातातून उडण्याआधी चिमणीने थोडेसे पंख फडकवले. मग तिने आपले पंख पसरवले. आणि ती उडाली. ती दूर असणाऱ्या झाडाच्या फांदीवर जाउस बसली.

आता आजी रोज आपल्या घराच्या अंगणात बसून चिमण्या दाणे टिपत असतांना बघत बसे. ती त्यात आपल्या चिमणीला शोधत असे. तिची काळजी घेत असतांना तिला तिचा लळा लागला होता. तिची चिवचिव ऐकण्यासाठी तिचे मन व्याकूळ होत असे.

तांदळाचे उरलेसुरले दाणे जमिनीवर पसरलेले बघून ती श्वास सोडत असे. तिला आशा वाटत होती की चिमण्याच्या थव्यात तिला तिची चिमणी कदाचित दिसेल.

तेव्हा एका सकाळी आजीला आपल्या खिडकीत एक चिमणी चिवचिव करतांना दिसली.‘‘ ही माझी चिमणी आहे का?” तिने मनातल्या मनात विचार केला.





ती तिला जवळून बघण्यासाठी खिडकीजवळ गेली. नक्कीच ती तीच होती. चिमणी उडी मारून तिच्या बोटावर येऊन बसली. आजीने तिला प्रेमाने डोक्यावर थोपटले. चिमणीने तिच्या हातावर एक भोपळ्याचे बी ठेवले आणि ती उडून गेली

''माझी छोटी चिमणी मला विसरली नाही," ती बी कडे बघत म्हणाली.

आजीची सून हे बघत होती. ती हसून म्हणाली, "एका सामान्य चिमणीच्या मागे लागून तुमचे डोळे कशाला भरून येत आहेत? आणि या एका बी मुळे तुमचे काय भले होणार आहे.

''पेरेल आणि काय? आणि त्यातून येणाऱ्या रोपाला सांभाळत माझ्या छोट्या मैत्रिणीची आठवण काढेल." आजीने हसत उत्तर दिले.

आजीने बी पेरले, ती रोज तुंबीच्या झाडाला पाणी घालत असे. जेव्हा कधी तिला तण दिसत असत तेव्हा ती ते उखडून टाकत असे, रोपाला लागलेली कीड वेचून काढून ती टाकत असे.



मग पानगळीचा मोसम आला. त्या एकुलत्या एक भोपळ्याचा वेल भोपळ्याच्या वजनाने वाकला होता. आजीने आपल्या परिवाराला ते खायला घातले. शेजाऱ्यांना वाटले. तिने कितीही भोपळे काढले तरी त्या वेलीवर नेहमी जरुरीपेक्षा अधिक भोपळे दिसत.

आजी खुश होती आणि तिचे कुटुंब मजेत भोपळे खात होता. आता ते तिला हसत नसत, तिची चेष्टा करत नव्हते.



जेव्हा गावातील सगळ्यांना भोपळे वाटून झाले, तेव्हा आजीने ठरवले की ती शेवटचे आठ भोपळे वाळवेल. म्हणजे त्याचा उपयोग काही सामान ठेवण्यासाठी होईल. तिने ते भोपळे घेऊन आली आणि वाळण्यासाठी लटकून ठेवले.

काही महिन्यानंतर आजी खिडकीजवळ बसून चिमण्या बघत होती तिला तिच्या चिमणीची आठवण येत होती.

जेव्हा ती भोपळा बघायला गेली तेव्हा ते चांगले वाळले होते. त्यांना काढतांना तिला आश्चर्य वाटले त्यांच्या वजनाचे. तिने विचार केला, “म्हातारपणामुळे ती खूप अशक्त झाली आहे”

तिने काळजीपूर्वक पहिल्या भोपळ्याचा वरचा भाग कापला. त्यात पांढरे तांदूळ बघून तिला आश्चर्य वाटले.

सुनेने आजीची आश्चर्यकारक आवाज ऐकला तेव्हा ती पळाली आणि तिने विचारले, “काय झालं आई?”

आजी आनंदाने बोलत म्हणाली की भोपळ्यात तांदूळ भरलेले आहेत.

''अशक्य!'' सून नाक वर करून म्हणाली. “तुम्ही काहीही म्हणत आहात आई! तुम्हीच वाळलेल्या भोपळ्यात तांदूळ ठेवले असतील आणि नंतर विसरल्या असतील.”

सुनेने चाकू उचलला आणि दुसरा भोपळा कापला. त्यातूनही तांदूळ निघाले.



हा चमत्कार बघून सुनेने बाकी उरलेले सहा भोपळे कापले. त्यातील प्रत्येक भोपळ्यात तांदूळ खचाखच भरलेले होते.

''माझी छोटी चिमणी त्या जादूसाठी जबाबदार आहे! आजी खुशीत म्हणाली.

''आई चला तांदूळ मोठ्या भांड्यात ठेवून कोठारात ठेवून देऊ या.” सुनेने सुचवले.

आजीने सुनेला एका मोठ्या भांड्यात तांदूळ काढतांना बघितले. तेव्हा कोठीघरात ते भांडे घसरत नेऊन ठेवण्यास तिने मदत केली.

त्यानंतर दोघीजणी भोपळे चाचपडू लागल्या तेव्हा त्या दोघी चकित झाल्या कारण भोपळे परत तांदूळाने भरले होते.

पूर्ण दुपारभर त्या दोघी भोपळे मोठ्या पातेल्यात रिते करत राहिल्या पण तांदूळ संपतच नव्हते.

इकडे त्या भोपळे रिकामे करत होत्या आणि तिकडे त्यात परत तांदूळ भरले जात होते.

कधी न संपणारया तांदूळा मुळे आजी लवकरच श्रीमंत झाली.



आजीच्या घराजवळ अजून एक म्हातारी आजी आणि तिचे कुटुंब राहत होती. नुकत्याच श्रीमंत झालेल्या आपल्या शेजाऱ्यांवर ते जळत होते. आजी आणि तिचे कुटुंब नवीन कपडे घातलेले बघून ते कुढू लागले. आजीच्या सुनेला त्यांचे टोमणे ऐकणे अजिबात आवडत नव्हते, तिला ते सहन होत नव्हते.

''ऐका,'' तिने आपल्या आईला म्हटले. "सगळ्या गावाला माहीत आहे की हा परिवार एवढा श्रीमंत झाला कारण त्यांच्या आईने एका जखमी चिमणीची काळजी घेतली, तिला बरे केले.





''तू पण त्या म्हातारी इतकीच अक्कलवान आहे," ते पुढे म्हणाले, "एखादी जखमी चिमणीचा शोध घे आणि तिची काळजी घेऊन तिला ठीक कर. चिमणी तुझे आभार मानेल आणि तुलाही त्या जादूच्या भोपळ्याचे बी देईल."

आपल्या कुटुंबासाठी मान सन्मान आणी पैसा मिळवण्याच्या लालसेने ती म्हातारी एका जखमी चिमणीचा शोध घेऊ लागली. ती आपला अधिकतर वेळ बाहेर चिमण्या बघत घालवू लागली. पण तिला एकही जखमी चिमणी दिसली नाही.

असाच एक आठवडा गेला, म्हातारी नाराज आणि अस्वस्थ झाली.

''मी तर काय माझी सून सुद्धा म्हातारी होईपर्यंत अशी बसून राहिली तरी जखमी चिमणी मिळणार नाही." ती खडबडीत जमिनीवर पसरलेल्या दगडांना लाथ मारत म्हणाली.

"आहा!" विजयी भावात ती म्हणाली.

"या दगडामुळे मला एक गोष्ट सुचली,"

ती खाली वाकली, तिने एक दगड उचलला. जवळ बसलेल्या दाणे टिपणाऱ्या चिमण्यांवर नेम धरून तिने तो फेकला.

"आहाहा!" ती टाळ्या वाजवत ओरडली. तिने मारून फेकलेल्या दगडामुळे एका चिमणीचा पंख तुटला.

"किती सोप्पं होतं," ती लडखडत उठणाऱ्या चिमणीला उचलत म्हणाली.

"ती एक म्हतारी एकाच चिमणीची देखभाल करत श्रीमंत झाली. जर माझ्याजवळ देखभाल करण्यासाठी तीन-चार चिमण्या असत्या तर मी अजून श्रीमंत होईल." तिने विचार केला.

जखमी चिमणीला एका टोपलीत ठेवत तिने तांदळाचे काही दाणे तिच्यापुढे टाकले. त्यामुळे अजून चिमण्या येतील असे तिला वाटले. तिने अजून छोटे छोटे दगड गोळा केले आणि वाट बघू लागली. जेव्हा खूप साऱ्या चिमण्या दाणे टिपायला आल्या, ती त्यांच्यावर दगड फेकू लागली.



काही अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर तिने आणखीन तीन चिमण्या जखमी केल्या.

तिने त्या तीन चिमण्यांना सुद्धा पहिल्या चिमणीबरोबर त्या टोपलीत ठेवले आणि त्यांना घरी घेऊन गेली. तीन त्यांना रोज औषध देई, टिपायला दाणे आणि पिण्यासाठी पाणी देत असे. काही महिन्यानंतर ती बरी झाली.

म्हातारीने त्यांना मुक्त केले आणि आनंदाने त्यांना उडतांना बघितले. "त्या लवकरच माझ्यासाठी बिया घेऊन येतील." तिने विचार केला.

"मी माझ्या शेजारणीपेक्षा खूप जास्त श्रीमंत होईल. माझे कुटुंब मला खूप मान देईल.

काही आठवडे गेल्यावर चार चिमण्या खरच परत आल्या. प्रत्येकीने एक-एक भोपळ्याचे बी दिले आणि उडून गेल्या. म्हातारीने हसत बी उचलले आणि चारी बिया पेरल्या.

बी पासून निघणाऱ्या रोपांपासून खूप सारे तांदूळ मिळण्याची ती वाट बघू लागली आणि त्याची तयारी करू लागली.






तिने आपल्या कोठारातली खूप मोठी जागा रिकामी केली. त्यात भरपूर टोपल्या आणि भांडी ठेवली.

भोपळ्याच्या वेलाला शेवटी भोपळे दिसू लागले. पण ना त्यांची संख्या खूप होती ना त्यांचा आकार मोठा होता.

“मी काही काळ अजून वाट बघते,” तिने स्वतःशी म्हटले. “ते नक्कीच मोठे होतील, त्याच बरोबर आणखीन भोपळे त्याला लागतील.


पण तिचे कुटुंबाचा धीर खचू लागला. “आपल्या शेजारांकडे केवढे तरी, मोठमोठे भोपळे लागले होते. त्यांनी सर्व गावाला वाटले होते, त्यांनी आपल्या आईला आठवण करून दिली.



‘तुझ्याकडे चार चार बिया होत्या. त्यातून तर आपल्याला खाण्यासाठी ढीगभर भोपळे मिळायला हवे होते. आणि वाटण्यासाठी सुद्धा.‘

कुटुंबात आणि शेजारीपाजारी आपलं नाक कापलं जाऊ नये म्हणून म्हतारीने काही भोपळे उतरवले.पण त्या सगळ्यांना दुर्गंधी येत होती.

ज्यांनी ते खाण्याचा प्रयत्न केला ते आजारी पडले. जाहीर आहे सर्व गाव खूप नाराज झालं. ते जमावाने म्हातारीच्या घरी आले.



ते आपल्या मुठी आवळून शिव्या देत होते. पण म्हातारी आणि तिचे कुटुंब विषारी भोपळे खाऊन एवढे आजारी होते की त्यांनी लोकांच्या नाराजीकडे लक्ष दिले नाही.

काही दिवसानंतर म्हातारी आणि तिच्या कुटुंबाची हालत सुधारली. तिने स्वतःला म्हटले की कदाचित तिने भोपळे काढण्याची घाई केली असेल. म्हणून आम्ही सगळे आजारी पडलो असू."

वेलीवर आता काहीच भोपळे शिल्लक होते. म्हणून म्हातारीने उरलेले भोपळे उतरवले आणि त्यांना वाळण्यासाठी लटकवून ठेवले. तिला विश्वास होता की काही दिवसानंतर तिला खूप सारे तांदूळ मिळतील.

खचाक! एक दिवस तिने सुकलेला पहिला भोपळा चाकूने कापला. त्यातून तांदूळ काढण्यासाठी तो उलटा केला. पण ती घाबरून ओरडली.



भोपळ्यातून हजारो माश्या बाहेर पडल्या. त्या म्हातारीच्या भोवती गुणगुणू लागल्या. म्हातारीचे ओरडणे ऐकून जो धावत येई त्यांच्यावर देखील माशा तुटून पडत.

टोपल्या, झाडूने फटकारत कुटुंबाला शेवटी घराच्या बाहेर पडावे लागले. चकित होऊन शेजारी म्हातारीला आणि तिच्या परिवाराला माशांनी घेरलेले असतांना रस्त्याने पळतांना बघत होते. हे सगळं बघून त्यांना आश्चर्य वाटत होते आणि काहीजण तर डोकं हलवून हलवून हसत होते.



माशांनी त्या कुटुंबाचा पाठलाग मागेपुढे, आत बाहेर सगळीकडे केला आणि शेवटी त्यांना गावाच्या बाहेर हाकलून दिले.

त्या दुसऱ्या म्हातारीने आणि तिच्या परिवाराने अनेक दिवसानंतर गावात घरी येण्याची हिम्मत केली.

घरातल्या उरलेल्या माशा पळवून लावण्यासाठी त्यांना एक आठवडा लागला. इकडे शेजारची म्हातारी आजी चिमण्यांसाठी तांदूळ साफ करत होती.पाच चिमण्या तिच्यापुढे हळूच उतरल्या. आजी त्यांच्याकडे बघत होती तेव्हा तिला वाटले की त्या तिच्याकडे बघून डोळे मिचकावत आहेत.

